॥ मराठी पाऊल पडती पुढे ॥

गायिकांः लता मंगेशकर, उषा मंगेशकर
गायकः पं. हृदयनाथ मंगेशकर, हेमंतकुमार
गीतः शांता शेळके
संगीतः आनंदघन (लता मंगेशकर)
चित्रपतः मराठा तितुका मेळवावा

खरा धर्म हा आपुला, जरी का कठिण जाहला।
तरी हाची अनुष्ठिला, भला देखे ॥

स्वराज्य तोरण चढे, गर्जती तोफांचे चौघडे।
मराठी पाऊल पडते पुढे ॥

माय भवानी प्रसन्न झाली
सोन-पावले घरात आली।
आजच दसरा आज दिवाळी
चला सयानो अंगणी घालू, कुंकुवाचे दरसडे ॥ १ ॥

आम्ही वीर उद्याचे
बाळमुठीला बळ वज्राचे।
वारस होऊ अभिमन्यूचे
दूध आईचे तेज प्रवाहे, नसातूनि सळसळे ॥ २ ॥

शस्त्र देशार्थ हाती धरावे। पिटावे रिपुला रणी वा मरावे॥
तुझ्या रक्षणा तुच रे सिद्ध होई। सदा संकटी देव धावोनि येई॥
जय जय रघुवीर समर्थ ॥

शुभ घडीला शुभ मुहूर्ती
सनई सांगे सगुणवंती।
जय भवानी, जय भवानी
दश दिशांना घुमत वाणी
जयजयकारे दुमदुमवू हे, सह्याद्रीचे कडे ॥ ३ ॥